अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com मंगळवार दि. ८ नोव्हेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ४२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## कोहली ठरला यंदाचा आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ



✔ **नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटचाच नाही तर जागतिक क्रिकेटमधील स्टार फलंदाज विराट कोहली याला नुकत्याच मानाच्या 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. ऑस्ट्रेलियात सुरु टी२० विश्वचषक स्पर्धेत विराट अप्रतिम खेळी करत असल्याने त्याला याच खेळीची जणू पोचपावती मिळाली आहे.

विराटसोबत वर्ल्डपमध्ये चांगली कामिगिरी करणारे आणखी दोन खेळाडूही नॉमिनेट झाले होते यामध्ये झिम्बाब्वेचा सिकंदर रझा आणि दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड मिलर यांचा समावेश होता. पण विराटची खेळीही विराट असून प्रेक्षकांनीही त्यालाच पसंती दिल्याने विराटनं पुरस्कारावर नाव कोरलं आहे. तर महिलांमध्ये पाकिस्तानची निदा दार विजयी झाली आहे. आयसीसीने क्रिकेटमध्ये उत्साह वाढवण्यासाठी हा पुरस्काराची सुरुवात केली होती. प्रत्येक महिन्याला हा पुरस्कार दिला जातो.

दरम्यान, पुरूष आणि महिला संघातील जे खेळाडू महिन्याभरात चांगली कामगिरी करून दाखवतात. त्यांची निवड करून त्यापैकी एकाला हा पुरस्कार दिला जातो. पुरुषांमध्ये वरील खेळाडूंना तर महिला क्रिकेटमध्ये भारताची जेमिमा रॉड्रीग्ज, दिप्ती शर्मा आणि पाकिस्तानच्या निदा दार यांना नामांकित करण्यात आलं आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

# ईडब्ल्यूएस आरक्षणावर बहुमताची मोहोर

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**आर्थिक दुर्बल घटकांना (ईडब्ल्यूएस) नोकरी आणि प्रवेशांसाठी देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदिल दिला आहे. १०३व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून ही करण्यात आलेली आरक्षणाची तरतूद वैध असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.**



पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या अध्यक्षतेखाली घटनापीठाने हा निकाल दिला आहे. केंद्र सरकारने १०३वी घटनादुरुस्ती करुन सवर्ण प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आरक्षणाची तरतूद केली होती. पाच न्यायमूर्तींपैकी तीन न्यायमूर्तींची सहमती होती तर दोन न्यायमूर्ती असहमत होते. सुप्रीम कोर्टाच्या या निकालामुळं देशभरात आर्थिक आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समाजात सन्मानाने जगता यावे आणि त्यांना शिक्षण आणि नोकरीची संधी प्राप्त व्हावी, यासाठी या घटकाला १० टक्के आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने आरक्षणाची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर देशात आर्थिकदृष्ट्या मागासांनादेखील आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात जवळपास ४० याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. न्या. उदय लळीत यांनी सरन्यायाधीशपदाची धुरा हाती घेतल्यानंतर या प्रकरणावर तातडीने घटनापीठासमोर सुनावणी घेतली होती. उदय लळीत यांच्या कामकाजाचा आज शेवटचा दिवसही आहे. त्यामुळं आरक्षणाच्या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते. सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांचे १० टक्के आरक्षण कायम राखण्याचा निकाल दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत, न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी, न्यायमूर्ती रविंद्र भट्ट, न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी आणि जेबी पारदीवाला यांच्या घटनापीठाने आरक्षणावर निकाल सुनावला आहे. चारही न्यायमूर्तींपैकी तीघांनी निकाल आरक्षणाच्या बाजूने दिला आहे. तर, सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह आणखी एका न्यायमूर्तीने आर्थिक आरक्षणाच्या तरतूदीला विरोध केला आहे.

### EWS म्हणजे काय?

EWS म्हणजे Economically Weaker Sections अर्थात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे अशा व्यक्तींना EWS अंतर्गत शिक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळू शकतं. हे आरक्षण एससी, एसटी, एनटी यांच्यासाठी नसून थोडक्यात ओपन कॅटगरीसाठी आहे.

### EWS चा फायदा कोणाला होणार?

✻ खुल्या प्रवर्गातील कुटुंबांना याचा लाभ होणार आहे. ✻ SC, ST, OBC आरक्षणातील लोकांना या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही. ✻ कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असलेल्या व्यक्तींना नोकरीत व शिक्षणात आरक्षण मिळू शकते. ✻ आरक्षणासाठी पात्र व्यक्तीच्या कुटुंबाची शेती पाच एकरापेक्षा अधिक नसावी. ✻ १ हजार चौरस फूट किंवा त्यापेक्षा जास्त मोठं रहिवासी घराचं क्षेत्र नसावे. ✻ महापालिका क्षेत्रातील कुटुंबांचे रहिवासी घराचे क्षेत्र ९०० चौरस फुटापेक्षा जास्त नसावे.

### EWS प्रमाणपत्र कसे मिळवाल?

EWS प्रमाणपत्र मिळवण्यापूर्वी, तुम्हांला EWS चा अर्ज डाउनलोड करावा लागेल. ते भरल्यानंतर, फॉर्ममध्ये विचारलेल्या कागदपत्रांसह ते तहसील कार्यालयात जमा करावे लागतील. तिथून पडताळणी केल्यानंतर तुम्हांला एथड प्रमाणपत्र मिळेल.

### कोणती कागदपत्र आवश्यक?

✻ लाभार्थी व त्यांच्या वडिलांचे आधार कार्ड, ✻ लाभार्थी व त्यांच्या वडिलांची TC/निर्गम उतारा, ✻ राशन कार्ड, ✻ रहिवाशी प्रमाणपत्र, ✻ उत्पन्नाचा पुरावा (सातबारा, ८अ/फॉर्म १६/आयकर भरल्याचा पुरावा), ✻ अर्जदार किंवा त्यांचे कुटुंबातील सदस्य १९६७ रोजी किंवा त्या आधीचे महाराष्ट्राचे रहिवाशी असल्या बाबतचा पुरावा, ✻ स्वघोषणा पत्र, ✻ विहित नमुन्यातील अर्ज, ✻ ३ पासपोर्ट फोटो ✻ EWS प्रमाणपत्र किती वर्षांसाठी वैध, ✻ EWS प्रमाणपत्राची वैधता फक्त १ वर्षांची आहे.

### सरन्यायाधीश लळीत यांचेही विरोधात मत

**घटनापीठाने ऐतिहासिक निर्णय देताना पाच पैकी तीन न्यायमूर्तींनी आरक्षणाच्या बाजूने कौल दिला तर सरन्यायाधीश उदय लळीत आणि न्यायमूर्ती रवींद्र भट या दोघांनी आर्थिक आरक्षणाच्या विरोधात मत दिले आहे. आर्थिक दुर्बल घटकांच्या १० टक्के आरक्षणाचा मार्ग आज मोकळा झाला.**



- आर्थिक आरक्षण घटनाविरोधी नाही,
- ५० टक्के मर्यादेच्या मूळ गाभ्याला धक्का नाही.
- एससी, एसटी, ओबीसींना आधीपासूनच आरक्षण
- आधी आरक्षण असलेल्यांचा सामान्यांच्या आरक्षणात समावेश करता येणार नाही
- आर्थिक दुर्बल आरक्षणासाठी वेगळा घटक
- आरक्षणाची कालमर्यादा असावी हे घटनाकारांचं मत
- घटनाकारांचे स्वप्न ७५ वर्षांनंतरही अपूर्ण
- सामाजिक न्याय आणि मूळ गाभ्याला धक्का बसेल
- १०३ वी घटनादुरुस्ती सामाजिक न्यायाच्या उद्देशाविरोधात आहे.
- आर्थिक आरक्षणापासून एससी, एसटी, ओबीसींना वेगळे ठेवणे चुकीचे आहे.

**आरक्षणाच्या बाजूने असणारे न्यायमूर्ती**

- न्या. बेला त्रिवेदी,
- न्या. दिनेश माहेश्वरी,
- न्या. जे. बी. पारडीवाला

**आरक्षणाशी असहमत असणारे न्यायमूर्ती**

- सरन्यायाधीश उदय लळीत,
- न्यायमूर्ती रवींद्र भट.

## इंटेलेक्टच्युअली करप्ट जजमेंट : ॲड.आंबेडकर

केंद्र सरकारने लागू केलेले आर्थिक आरक्षण वैध असून हे आरक्षण घटनाविरोधी नसल्याचा निकाल घटनापीठाने दिला आहे. यावर 'हा बौद्धिकदृष्ट्या भ्रष्ट निर्णय' असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने लागू केलेले आर्थिक आरक्षण वैध असून हे आरक्षण घटनाविरोधी नसल्याचा निकाल घटनापीठाने दिला आहे. पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला आहे. यावर विविध प्रतिक्रिया येत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी हा निर्णय इंटेलेक्टच्युअली करप्ट जजमेंट अर्थात बौद्धिकदृष्ट्या भ्रष्ट निर्णय असल्याचे म्हटले आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, 'हा अत्यंत इंटेलेक्टच्युअली करप्ट जजमेंट आहे.



दुसऱ्या नव्या रितीने मनुस्मृतीची सुरुवात झाली. दोन गोष्टी मिसआऊट झाल्या आहेत. संविधानाने आर्टिकल १६ मध्ये बॅकवर्ड क्लासेस वापरले आहे. संसदेत एकदा याबाबत स्पष्टीकरण देताना 'कास्ट' हा शब्द का वापरला नाही, त्यावेळी बाबासाहेबांनी उत्तर दिले होते की, 'आय डोन्ट वॉण्ट टू टाय डाऊन दिस कंट्री टू कास्ट', चळवळी झाल्या पाहिजेच म्हणून 'क्लास' हा शब्द वापरला. आर्टिकल ३४१ मध्ये शेड्यूल्ड ऑफ कास्ट म्हटले आहे, शेड्यूल कास्ट म्हटलेले नाही. कास्टलेस सोसायटीकडे जाण्याची परिस्थिती असताना इकॉनॉमिकली वीकर सेक्शन निर्माण करणे हा संविधानाच्या मूलभूल तत्त्वांच्या विरोधात आहे. संसदेची ही घटनादुरुस्ती परिच्छेद ३६७ च्या विरोधात आहे. हा सर्वोच्च न्यायालयाचा नव्हे तर घटनापीठाचा निर्णय आहे. या निर्णयाने मागच्या दाराने मनुस्मृती आली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची व्याख्या नमूद करताना जात हा आधार नाही तर आर्थिक परिस्थिती आहे. पण उरलेल्या ओबीसी, एसटी, एससीना विशेष आरक्षण मिळते म्हणून त्यांना यातून वगळणे हे तत्व आर्टिकल १४ च्या विरोधात आहे, असे मी समजतो.

## कुंभारवेशीत तीन दुकाने फोडली; रोकड लंपास

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर शहरातील कुंभार वेस भागातील हॉटेलसह तीन दुकानांमध्ये रॉडने शटर उचकटून सोमवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे.यामध्ये एका कपड्याच्या दुकानांमधून सुमारे ३१ हजारांची रोकड चोरीला गेल्याची माहिती येथील व्यापाऱ्यांनी दिली.

सोलापूर शहरात चोरींचा सुळसुळाट वाढत चाललेला आहे. कुंभार वेस येथे पहाटेच्या सुमारास तीन दुकानांत चोरट्यांनी प्रवेश करीत स्क्रू ड्रायव्हरच्या साह्याने गल्ला तोडत गल्ल्यातील रोख रक्कम पळविली आहे.सीसीटीव्हीमध्ये चोरट्यांचे कारस्थान रेणुका स्वीटसमोर लावलेल्या दुकानातील कॉमेरात टिपले गेले आहे. या भागात पोलिसांनी रात्र गस्त करावी अशी मागणी करण्यात आली.याप्रकरणी तीन दुकानांपैकी महेश ट्रेडर्स नावाच्या कपड्याचे दुकानदार गणेश चंद्रमोहन भूमकर (वय-३५,रा.पूर्व मंगळवार पेठ, उदगिरी गल्ली, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.भूमकर यांच्या कपड्याच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने कॅश काउंटर टेबलचे ड्रायव्हर तोडून ३१ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली आहे, असे फिर्यादीत नमूद असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

## भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात दाखल

✔ **नांदेड :** राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात दाखल झाली असून ती आज नांदेडमधील देगलूर या ठिकाणी पोहोचली आहे. यावेळी राहुल गांधी यांनी आणि त्यांच्यासोबत असलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या हाती मशाली घेतल्या होत्या.

देगलूर नाक्यावर ही मशाल यात्रा आल्यानंतर राहुल गांधी हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर ही यात्रा गुरुद्वाराच्या दिशेने जाणार आहे. तेलंगणामध्ये एका ठिकाणी कार्यकर्त्यांच्या हाती मशाली दिसल्या होत्या. पण काँग्रेसची आजची मशाल यात्रा ही भव्य अशीच होती. स्वत: राहुल गांधी यांनी हाती मशाल घेतली होती.

## उड्डाणपुलाच्या पहिल्या टप्प्यातील अधिसूचना आठवडाभरात काढा

**आयुक्तांच्या भूसंपादन उपजिल्हाधिकाऱ्यांना सूचना**

✔ सुराज्य/सोलापूर

उड्डाणपुलाच्या कामाने बाधित होणाऱ्या मिळकतींच्या मूल्यांकनाचा अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर झाला आहे. भूसंपादनाची अधिसूचना याच आठवड्यात लगेच काढावी, अशी सूचना महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी भूसंपादन उपजिल्हाधिकारी अरुणा गायकवाड यांना केली.

महापालिका, विशेष भूसंपादन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाने जुना पूना नाका ते पत्रकार भवन चौक यादरम्यान होणाऱ्या उड्डाणपुलाच्या भूसंपादनासाठी मिळकतींच्या मूल्यांकनाचे काम जवळपास पूर्ण केले आहे. एकूण १० टप्प्यांत नुकसानभरपाई निश्चितीची अधिसूचना काढण्यात येणार आहे. विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी जुना पूना नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक यादरम्यानच्या मूल्यांकनाचा अहवाल भूसंपादन उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला. सोमवारी शिवशंकर यांनी तातडीने जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना फोन केला. जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन अधिकारी अरुणा गायकवाड यांच्याशी चर्चा करून प्रस्ताव मागवून घेऊ असे सांगितले. आयुक्तांनी उपजिल्हाधिकारी गायकवाड यांनाही फोन करून प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्याची सूचना केली.

## शिक्षणाधिकारी किरण लोहार निलंबित

✔ **सोलापूर :** मागील आठ ते दहा दिवसांपासून संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून देणाऱ्या जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना झालेल्या अटकेची जिल्हाभर चर्चा होत असताना सहा दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर अखेर शासनाकडून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

दि. ३१ ऑक्टोबर रोजी २५००० रूपयांची लाच घेताना प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.किरण लोहार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. दि. ३ नोव्हेंबर रोजी लाचलुचपत विभागाकडून अहवाल प्राप्त होताच तातडीने जिल्हा परिषद प्रशासनाने अवर सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई, आयुक्त शिक्षण विभाग पुणे व संचालक शिक्षण विभाग पुणे या कार्यालयांना शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्यावर पुढील प्रशासकिय कारवाईसाठी अहवाल पाठवला होता. त्यानुसार राज्य शासनाकडून शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांना या संकटातून वाचवण्यासाठी अनेक वरिष्ठ पातळीवरून अनेकांनी प्रयत्न केल्याचे जिल्हाभर चर्चा होती. शिक्षण अधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर शिक्षक आणि किरण लोहार यांच्यात अधून-मधून खटके उडायचे.




त्यामुळे शिक्षणाधिकारी आणि शिक्षक संघटना यांच्यात मोठा रोष निर्माण झाला होता आणि अशातच त्यांच्यावर अशा प्रकारची कारवाई झाल्याने शिक्षण संघटना आणखी स्ट्राँग होत गेल्याचे दिसले. त्यामुळे अखेर शेवटी सोमवारी त्यांना निलंबनाच्या कारवाईस सामोरे जावे लागले आहे.

### शिक्षणाधिकारी किरण लोहार यांना जामीन

लाच प्रकरणी पोलीस कोठडीत असलेल्या शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्या जामीन अर्जावर सोमवारी जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.पांढरे यांच्यासमोर सुनावणी व त्यांची जामीनवार सुटका करण्यात आली. यावेळी जामीन अर्जाच्या सुनावणीच्या वेळेस अर्जदार आरोपीचे वकील ॲड.मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तिवातात गुन्ह्याचा तपास हा पूर्णत्वात आलेला असून, साक्षीदारांवर दबाव आणण्याचा कोणताही प्रश्न येत नाही. तसेच आरोपी हा कोठेही पळून जाणार नाही असा युक्तिवाद मांडला, तो ग्राह्य धरून न्यायाधीश आर.एन पांढरे यांनी २० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. या आरोपी तर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड.विनोद सूर्यवंशी तर सरकारी वकील म्हणून गंगाधर रामपुरे यांनी काम पाहिले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अजून काय काय पहावं लागेल?

| कल्याण |
| --- |
| 270-99-568 |

| मेन बाजार |
| --- |
| 112-46-556 |

# जिल्ह्याबाहेरील पालकमंत्र्याची नियुक्ती अडचणीची

✔ सुराज्य/अजित उंब्रजकर

**सोलापूर शहर जिल्ह्याचे नवे पालकमंत्री नेते राधाकृष्ण विखे पाटील यांची नेमणूक होऊन बराच काळ उलटून गेला आहे. तरी पालकमंत्री म्हणून नियुक्त झाल्यावर त्यांनी सोलापूर शहराला एकदाच भेटी दिली. मंत्र्यांच्या या भेटीला महिना उलटून गेला आहे. दुसरीकडे मंत्रिमंडळाचा विस्तारही लांबणीवर पडत आहे. त्यामुळे आणखी महिने दोन महिने तरी सोलापूर शहर आणि जिल्ह्याला उपऱ्याच पालकमंत्र्यावर समाधान मानावे लागणार आहे.**

## महिनाभरापूर्वी झाला होता दौरा; धोरणात्मक निर्णय प्रलंबित

जिल्ह्याच्या राजकारणात व प्रशासकीय कामकाजात पालकमंत्री राजा मानला जातो. सरकारच्या सर्व योजनांची जिल्ह्यातील अंमलबजावणी पालकमंत्र्यांशी निगडीत असते.



महाविकास आघाडीचे सरकार असताना सोलापूर शहर आणि जिल्ह्याला तब्बल तीन पालकमंत्री मिळाले होते, तेही परजिल्ह्याचे होते. त्यानंतर भाजपची आणि शिंदे गटाची सत्ता आल्यानंतरही सोलापूर शहर आणि जिल्ह्याला बाहेरचेच पालकमंत्री मिळाले,पण आपल्या शेजारचे.हीच समाधानाची बाब होय. पालकमंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर ते ४ ऑक्टोबर रोजी शहरात आले होते. त्यावेळी त्यांच्या हस्ते काही विकास कामांचे उद्घाटन आणि जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली होती. मात्र आज त्याला तब्बल महिना उलटून गेला तरी पालकमंत्री अद्याप सोलापूरकडे फिरकलेले नाहीत. जिल्ह्याच्या विकासासंदर्भातील काही धोरणात्मक निर्णयात पालक मंत्र्यांची संमती आवश्यक असल्याने काही विषय प्रलंबित आहेत.त्यामुळे जिल्ह्याबाहेरील मंत्र्याची पालकमंत्री नियुक्ती अडचणीची ठरू लागल्याचे चित्र आहे.

विखे-पाटील यांचा मतदारसंघ असलेल्या नगरमध्येमध्ये त्यांनी जोरदार काम सुरू केले आहे. तेथे जनता दरबार, संपर्क कार्यालय सुरू झाले आहे. सोलापूर जिल्ह्याला त्यांनी वाऱ्यावर सोडल्याची स्थिती आहे.

### ▪ कार्यकर्ते कमित्यांबाबत आशादायी

राज्य सरकारमधील विविध विभागांशी संबंधित जिल्ह्यातील कामे करून घेण्याची जबाबदारी पालकमंत्र्यांची असते. यासाठी बहुतांश विभागाच्या स्थानिक स्तरावर शासकीय समित्याही असतात. अशा समित्यांतून अशासकीय सदस्य पालकमंत्रीच नियुक्त करतात. आता राज्यातील नव्या सरकारने पूर्वीच्या समित्याही बरखास्त केल्या आहेत. त्यावर आपली वर्णी लागावी म्हणून भाजप आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते प्रतीक्षेत आहेत. मात्र पालकमंत्री सोलापूरला आल्यावरच या विषयाला मुहूर्त लागणार आहे.